**चंद्रपूर येथे सैनिकी शाळेसाठी नवीन वाहन खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रिडा विभाग**
**शासन निर्णय क्र. चंसैशा - २०१९/प्र.क्र.११/ एसएम-६**
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ११ जुलै, २०१९

**<u>संदर्भ</u>** : मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांचे क्र. जिपचं/ शि(मा)/ शैशा/ १०/ २०१९, दि. २४.०१.२०१९

**<u>प्रस्तावना :</u>**

दि.०९.०४.२०१५ रोजीच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत भिवकुंड, जि. चंद्रपूर येथे सातारा सैनिक शाळेच्या धर्तीवर नवीन सैनिक शाळा सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

चंद्रपूर सैनिक शाळेबाबत केंद्र सरकार(केंद्रीय संरक्षण मंत्रालय) व राज्य शासन यांच्यामध्ये दि. १५ जुन २०१६ रोजी सामंजस्य करार करण्यात आला आहे. सदर सामंजस्य करारातील तरतुदींनुसार, प्रस्तुत सैनिक शाळेसाठी गरजेनुसार सर्व प्रकारची वाहने खरेदीसाठी येणा-या आर्थिक भाराची जबाबदारी राज्य शासनाची आहे.

२. चंद्रपूर सैनिक शाळेचे बांधकाम प्रगतिपथावर असून जुन २०१९ पासून सदर शाळा कार्यान्वित झाली आहे. केद्रीय संरक्षण मंत्रालयाचे निरिक्षण अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे चंद्रपूर सैनिक शाळेसाठी एकूण ६ वाहने खरेदी करण्यासाठी रु. १२३.२४ लक्ष इतक्या निधीचा प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांनी संदर्भाधीन पत्रान्वये शासनास सादर केला आहे. याअनुषंगाने चंद्रपूर सैनिक शाळेसाठी एकूण ६ वाहने खरेदी करण्यास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

चंद्रपूर सैनिक शाळेसाठी रु. १२३.२४ लक्ष (रुपये एक कोटी तेवीस लक्ष चोवीस हजार फक्त) इतक्या किंमतीच्या मर्यादेमध्ये खालीलप्रमाणे एकूण ६ वाहने खरेदी करण्यास व त्यासाठी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहनाचे नाव | खरेदी करावयाच्या वाहनांची संख्या |
|---|---|---|
| १. | Staff Car (Innova) | ०१ |
| २. | Ambulance | ०१ |
| ३. | Water Tanker | ०१ |
| ४. | Truck/ Mini Vehicle | ०१ |
| ५. | 50 Seater Bus | ०१ |
| ६. | Motor Cycle (Enfield Bullet) | ०१ |

२. सदर नवीन वाहन खरेदी करण्यास खालील अटींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे. :-

१) नवीन वाहने विहित कार्यपध्दतीस अनुसरुन खरेदी करण्यात यावीत.

२) प्रस्तुत खरेदी करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दिनांक २४.०८.२०१७ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. तसेच शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या खरेदीबाबतच्या अटी व शर्तीनुसार खरेदी प्रक्रियेची कार्यपध्दती अवलंबवावी.

३) प्रस्तुत खरेदी करताना उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१६/प्र.क्र.२१५/ उद्योग-४, दि.२४.०८.२०१७ व शासन निर्णय क्र. भांखस २०१७/ प्र.क्र.२०४/ उद्योग-४, दि.०८.१२.२०१७ या शासन निर्णयातील तरतुदींच्या अनुषंगाने विहित पध्दतीचा अवलंब करुन केली जाईल याची काटेकोरपणे खात्री करावी.

४) नवीन वाहने खरेदी केल्यानंतर त्यासंबंधी अनुपालन अहवाल शासनास सादर करावा.

५) वाहनचालकांची आवश्यक पदे भरण्याबाबत प्राचार्य, चंद्रपूर सैनिक शाळा यांनी नियमाप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

३. सदर खर्च सन २०१९-२० या आर्थिक वर्षात “मागणी क्र. ई-२, २२०२- सर्वसाधारण शिक्षण, ०२- माध्यमिक शिक्षण, ११०- अशासकीय माध्यमिक शाळांना व कनिष्ठ महाविद्यालयांना सहाय्य, (००) (०३) पूर्वाध्ययन सैनिकी शाळांना सहायक अनुदान(अनिवार्य), (२२०२ ०४६९), ३१- सहायक अनुदाने (वेतनेतर)” या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. यामध्ये कोणतीही वित्तीय अनियमितता होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

३. सदर आदेश वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र. १५६/विनियम, दिनांक २९.०३.२०१९ अन्वये प्राप्त सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०७१११२१५४८२६२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Swati Madhukar Nanal

Digitally signed by Swati Madhukar Nanal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=82e1d6f07c5cabf5884958ee70015d36b35b2c07e9700fe62cba2439a81b4be4, serialNumber=007d84f8ce44beba86b0ca2d0155d67cc1a9db4f8d59bc9d8067628d62bcdc1a, cn=Swati Madhukar Nanal
Date: 2019.07.12 17:50:57 +05'30'

**( स्वाती म. नानल )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मुख्यमंत्री सचिवालय यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई ३२
२. सर्व विधान सभा /विधान परिषद सदस्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मुख्य सचिव यांचे उप सचिव
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. आयुक्त ( शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
८. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर
९. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, नागपूर,
१०.शिक्षण संचालक ( माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
११.शिक्षण संचालक ( प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
१२.विभागीय शिक्षण उप संचालक,नागपूर विभाग, नागपूर
१३.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, चंद्रपूर
१४.कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. २, चंद्रपूर,
१५.शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ), जिल्हा परिषद, चंद्रपूर
१६.शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ), जिल्हा परिषद, चंद्रपूर
१७.प्राचार्य, चंद्रपूर सैनिक शाळा, भिवकुंड, जि. चंद्रपूर
१८.कक्ष अधिकारी, (व्यय ५/ विनियम), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१८.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. निवडनस्ती.

**प्रत माहितीसाठी-**

१. मा. मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ३२
२. मा. मंत्री (शालेय शिक्षण) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय,मुंबई ३२
३. अपर मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई ३२.